# निष्कर्ष

१) प्रबंधलेखिका ही इ.स. २००० ते २००६ या काळात महाराष्ट्र विधानपरिषदेची सदस्या होती, त्यामुळे ज्याप्रमाणे उपलब्ध लिखित भाषणांच्या संविधानावरून तिने संशोधन मांडलेले आहे. तसेच भाषणे, वक्तव्ये व त्यांचा सभागृहातील अप्पर सदस्यांवर होणारा परिणाम यांचा तिने प्रत्यक्षात अनुभव घेतलेला आहे. सबब, सदर संशोधन हे केवळ उपलब्ध संविधानचे नसून त्यात अनुभवनिष्ठ तरीही अहंनिरपेक्ष संशोधन तिने मांडलेले आहे.

२) सदर संशोधनात सामान्यतः इतर संशोधन विचारांचा वापर केला असला तरी विशेषत्वाने वैचारिक गद्याचे संशोधन व आधुनिक स्त्रीवादाचे रूप तिने एकीकरणाने अंगीकारले आहे.

३) वाचिक (वाङ्मय) साहित्य हे ही साहित्यच आहे, हे सर्वमान्य गृहीत तत्व येथे पूर्वप्रतिज्ञा म्हणून वापरले आहे.

४) तथाकथित भारतभर पसरलेल्या महाराष्ट्रात मराठी बोलणाऱ्या स्त्रियांचे अमाप योगदान आहे. तरीही विदर्भकन्या दमयंती व विदर्भकन्या रुक्मिणी यांच्या राजकीय कार्याचा विशेष विचार न करता जिजाऊसाहेब, रायबागन, सावित्रीबाई देशमुख, माहूर, अहिल्याबाई होळकर, झाशीची राणी लक्ष्मीबाई इत्यादींच्या लगतच्या मध्ययुगातील स्त्रियांच्या राजकीय कार्याचा ऊहापोह केलेला आहे.

५) केवळ महाराष्ट्र नव्हे तर, रायबागन वगळता, इतर सर्व मराठी स्त्रियांनी राष्ट्रीय स्वातंत्र्यासाठी केलेल्या योगदानाचा परामर्श घेण्यात आलेला आहे.

६) महाराष्ट्राबाहेरील मराठी स्त्रियांच्या कार्यासाठी सदर प्रबंधात विचार केला आहे. (वसुंधरा राजे, सुमित्राताई महाजन, प्रतिभाताई पाटील इ. राजकीय दृष्टिने पराक्रमी असलेल्या स्त्रियांच्या कार्य कर्तृत्वाचा विचारही केला आहे.

७) विधिमंडळाची सभागृहे दोन पैकी एक म्हणजे विधानसभा व दुसरे म्हणजे विधानपरिषद, वास्तूनुसारच नव्हे तर, मानाच्या दृष्टिने खालचे सभागृह व त्यावर अंकुश ठेवणारे वरचे सभागृह असा व इतरही भेद सदर प्रबंधात हेतूतः दाखविण्यात आला आहे.

८) विधानसभा व विधानपरिषद यात पुरूष आमदारांची संख्या ही स्त्री आमदारांपेक्षा कितीतरी पटीने जास्त राहिली आहे. तरीही त्या उपस्थितीमुळे दबून न जाता स्त्री आमदारांनी कणखरपणे खणखणीत भाषणे दिली आहेत.

९) स्त्रियांनीच फक्त स्त्रियांच्या प्रश्नांबद्दल बोलावे, इतरांचा त्याच्याशी संबंधच काय? अशी माननीय सभापतींची, प्रतोदांची देखील भावना राहिली होती. त्यातही परिवर्तन घडवून आणण्याचे महत्त्वाचे कार्य स्त्री – आमदारांनी केले आहे.

१०) सर्वप्रथम स्वतःवर झालेले संस्कार (कंडिशनिंग) निपटून टाकून पुरूषांच्याही मानसिकतेत (कंडिशनिंग) असलेला पुरूषी ताठा तेथे समता विचाराची प्रतिष्ठापणा स्त्री आमदरांनी केलेली आहे.

११) पक्षोपक्षांचे राजकीय विचार सकृत दर्शनी भिन्न भिन्न वाटत असले तरीही, या राजकीय विचारांना असलेला भावनेचा ओलावा सर्व महिला आमदारांनी एकत्वाने दिलेला आढळतो.

१२) सामाजिक विषयांवर स्त्री- आमदारांची भाषणे ही भावनेला विचारांची ऊब असलेली व विचारांना भावनेची ऊब असलेली आढळून येतात. पुरुष आमदारांच्या सामाजिक विषयांवरील भाषणांवरील एक सामाजिक पक्षपाती विचार सहसा आढळून येतो. तसा स्त्री आमदरांच्या व्याख्यानात नाही.

१३) सांस्कृतिक विषयांवरती स्त्रियांनी भाष्य करणे .यांत पुरुष आमदारांनी त्या स्त्रिया म्हणून, हस्तक्षेप केला नसला तरी त्यांच्या भाष्यांमधून एक स्त्री विषयक टवाळीचा अंतःस्वर असला पाहिजे असे वाटते.

१४) मूळातच स्त्रीला जगभर दुय्यम वागणूक दिली जाते. भारतात स्त्रीला देवीपदी नेऊन ठेवले असले तरी ‘कलत्र’ असा तुच्छतेचा उल्लेख येतो. स्त्रीबद्दल असलेला उमाळा येण्यासाठी ती पतिता, परितत्त्या, बालविधवा, परजातीतील अशी सामाजिक लचांडे घेऊन उभी असेल तरच येताना दिसतो. स्त्रीला ‘स्त्री’ म्हणून प्रतिष्ठा भारतीय समाजात मतदानाने लाभले असले तरीही प्रत्यक्षात नाही.

१५) स्त्री – आमदरांच्या, सभागृहातील उपस्थितीच्या, व्याख्यानांच्या मूळाशी असलेली वेदना आदिम स्वरूपाची आहे.

१६) त्यामुळे सामाजिक व सांस्कृतिक संदर्भातच काय स्त्रीचा राजकीय विचार हा पक्षनिष्ठपणा वगळता, प्रगल्भतेतच मोडता येईल.

१७) त्यामानाने संसद किंवा विधिमंडळ येथील स्त्रियांची अत्यल्प संख्या ही चिंतेची बाब ठरू शकते.

१८) स्त्रियांच्या विद्यापीठाला १०० वर्षे पूर्ण होत असताना स्त्रीआमदाराचे ‘शिक्षितपण’ कोणताही राजकीय पक्ष विशेषत्वाने विचारात घेत नाही. तो त्यांनी विचारात घ्यावयास हवा असे आकलन मांडता येते.

१९) स्त्री आमदार ही शिक्षितही असल्यामुळे असेल, पुरूष आमदारांप्रमाणे ती चिकित्सात्मक बोलताना आढळून येईल.

२०) स्त्रियांच्या व्याख्यांनांत सहजपणे मराठी वाक्प्रचार, म्हणींचा वापर होतो.

२१) स्त्रीचे भाषण हे लडिवाळ, लाघवीपणाने होते. मातृत्वाची झलक आढळते.

२२) रयतेच्या समस्यांच्या मुळाशी जाण्याची तिची असोशी हेच मुख्य कारण असले पाहिजे.

राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक विषयांवर स्त्री आमदारांचे विचार प्रकटीकरण हे गंभीर, मनःपूर्वक, विचारपूर्ण असे असून पुरुष आमदार हे गंभीर दिसले तरीही केवळ रितिपालन करणारे आहेत. असे सर्वसामान्यापणे चित्र दिसते. पुरूषांच्या चित्तांत रयतेविषयीची जाणीव असली तरी ती स्त्री – आमदारांप्रमाणे त्यांच्या भाषणांतून खुटीखुटी उद्रेक पावत नाही.

स्त्रियांची भाषा ही जिव्हाळ्याची, म्हणी, वाक्प्रचारांनी सहज आलेली असून प्रसंगी लाघवी बोलीच्या रूपात उमटते. रयतेच्या समस्यांच्या मूळाशी जाण्याची तिची असोशी तेथे स्पष्टपणे जाणवून येते.

जसे नदीच्या खोल डोहात दगड टाकला की, पाण्यावर तरंग उठतात, एकांतून एक अशी वर्तुळे उठतात, आणि पाहणाऱ्याला मोठी मजा वाटते, त्याप्रमाणे याविषयांच्या खोलापर्यंत जाताना मला अनुभव आला, स्त्री – रंगांचे अनेक तरंग त्यांच्या भाषणातून जाणवतात. त्या स्त्री आमदारांच्या भाषणांतून, त्यांच्या चष्म्यातून विविध विषयाकडे पाहण्याच्या खूपशा खाचाबोचा जुळवल्यात तशांच काही निसटल्याही आहेत.

# उपसंहार

व्याख्यान म्हणजे मौखिक रूपातील वैचारिक वाङ्मय या दृष्टिने सदर विचारांचे संशोधन.तथापि हे वैचारिक वाङ्मय मूळात लिखित स्वरूपात नसून एकूण लेखननिर्विष्ट केले आहे. त्यामुळे कोठे कोठे पसरटपणा येऊ शकतो. तर कोठे कोठे ऐन प्रतिमेचा साज चढू शकतो.

ही व्याख्याने रसिकरंजनासाठी अगर व्याख्यानमालेतील नसून ती वास्तवदर्शी, तत्कालिक घटनांच्या अनुषंगाने आहेत. सबब व्याख्यानरूपी वैचारिक निबंधाचा वाङ्मयीन संशोधन ही एक प्रणाली आहे. येथे स्त्रियांच्या व्याख्यानांचा विचार शोधून काढावयाचा असल्यामुळे स्त्रिची दृष्टी, तिची स्वप्ने, तिच्या आकांक्षा, तिची मानसिकता, तिची बुध्दी याचा वेध घेत असताना तो जसा स्वायत्त राहील तसाच पुरूषी मानसिकतेच्या संदर्भगृहात देखील राहील. स्त्रीवादी भूमिका तसेच पुरूषांनी केलेला विचार कसा असू शकतो. संभाव्यतेचा सिद्धांत या अनुषंगाने गणितशास्त्रातील संभाव्यतेच्या सिद्धांताचा इष्ट जागी आश्रय घेतलेला आहे. अभ्यासकर्तीचे मार्गदर्शक प्रो.डॉ.शिरीष गोपाळ देशपांडे यांच्या सदर संशोधन प्रणालीचा हा वापर होय.

महिला आमदारांची भाषणे वाचल्यावर, त्यावर प्रकाश टाकताना एका गोष्टीची प्रकर्षाने आठवण येते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी महिलांना असे म्हटले होते की, तुमच्या घराच्या भिंतीवर लिहून ठेवा की मला राज्यकर्ती जमात बनायची आहे. डॉ. आंबेडकर खरेच द्रष्टे होते. आज राजकारणात महिलांची भागीदारी वाढली आहे. सत्तेत लोकप्रतिनिधींची संख्या म्हणजेच विधिमंडळ, स्थानिक स्वराज्य संस्था यात वाढलेली दिसून येते. आज स्थानिक स्वराज्यसंस्थेत ५०% आरक्षण मिळाले आहे. राजकीय जागृती त्यांच्यात दिसून येते. एकूणच महिला आमदारांची भाषणे पाहता, पुरुष कॅज्युअल असतात असे जाणवते. स्त्री ही गंभीर असते. निर्णय व निष्कर्ष यांच्याबद्दल पुरुष निर्विकार असतात. स्त्रियांना निर्णयही व निष्कर्षही हवे असतात. खर तर हा बांधिलकीचा भाग आहे.

स्त्रियांच्या भाषणांची भाषा ही साधीसुधी सोपी असली तरी लडिवाळ आहे. पुरूषांच्या भाषणात तुटकपणा जाणवतो. स्त्रिच्या भाषणाला निबंधाची गोडी आहे. त्यात सहज विचार आहेत. तिचं स्त्रीवादी असणं वा नसणं यापेक्षा पूर्णपणे मानवतावादी असणं फार महत्त्वाचे यातून जाणवते. स्तरीकरणाचा विचार न करता, पुरूषांच्या उच्च स्तर तर स्त्रियांचा खालचा स्तर असे कोठेच जाणवत नाही. अगदी अंजनाबाई मगर, प्रभा राव, प्रतिभा पाटील, निर्मला ठोकळ किंवा त्यानंतरच्या पिढीतील मृणाल गोरे, नीलम गोऱ्हे , विजया दराडे, संजीवनी रायकर यांची भाषणे वाचत असतांना स्त्रियाही बारकाईने अभ्यास करून योग्य समर्पक संदर्भासहित त्यांची भाषणे देतात असे आढळतात.

महागाई प्रश्न, सीमा प्रश्न, पाणी प्रश्न सुरक्षेचा प्रश्न, महिला विषयक, शिक्षणक्षेत्र यावर भाष्य करताना फक्त भाषणच नव्हे तर काही सूचनाही त्या करतात. मातृत्वाचा अधिकार गाजवताना अनेक वेळा लक्षात येते.

ग्रामीण भागातून आलेल्या महिला आमदार शेती पूरक उद्योगधंदे शेती विकासासाठी लागणाऱ्या भांडवली खर्चाची बचत कशी केली जाईल. यावर पर्यायी म्हणून सेंद्रिय शेतीचा पाठपुरावा करण्यासाठी दुभत्या गायी व सुदृढ बैल शेतकऱ्यांना कसे पुरवता येतील. गुराढोरांना उत्तम चारा कसा निर्माण करता येईल. याचाही त्या विचार करताना दिसून येतात. चारा उत्तम तर दूधही भरपूर, व्यवसायाला हे पूरकच आहे. पाणीटंचाई असेल तर शेततळी, विहिरींचे खोलीकरण यावरही ती प्रकाश टाकते. शिक्षकी पेशातून आलेल्या महिला आमदार विषयांचे नियोजन, टिपणं समर्पक उदाहरणे, प्रमाण भाषेचा वापर, भाषेला वाङ्मयीन मुलामा, वेळेचे नियोजन असते. प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक अभ्यासक्रम विद्यार्थी संख्या, शिक्षक संख्या याचे समीकरणही आहे. शिक्षकांच्या अडचणी, त्यांचे वेतन, अनुदानित विनाअनुदानित शाळांचे प्रश्न त्या हिरीरीने मांडतात. कायदेतज्ञ महिला आमदार निष्कर्षावर भर देताना दिसतात. त्यासाठी अनेक घटनाक्रमांचा उल्लेख त्या करतात. विषयाकडे शास्त्रोक्त पद्धतीने न्यायाच्या भूमिकेतून विचार प्रकट करताना जाणवतात. वस्तूनिष्ठतेवर त्यांचा भर दिसून येतो. त्वरित परिणामांची अपेक्षा दिसते.

सामाजिक क्षेत्रातून आलेल्या महिला आमदार समाजविकास, समाजातले बारकावे, प्रथा, रूढी परंपरा यावर प्रकाश टाकतात. समाजविकासातले अडथळे, शक्तिस्थाने, कमजोर वर्ग याचाही त्या विचार करतात, समाजबांधिलकी, संस्कार त्यांना महत्त्वाचे वाटतात. समाजातील पुरूषप्रधान संस्कृतीवर आघात करताना त्या दिसतात. स्त्रीश्रेष्ठत्व सर्वतऱ्हेने पटवून देण्याचा प्रयत्न दिसून येतो. निलम गोऱ्हे, निला देसाई, प्रतिभाताई पाटील, प्रभा राव, विजयाताई दराडे यांची भाषणे समाजसुधारणा करण्यासाठी उपाययोजना सुचवणारी आढळतात. सर्वधर्मसमभाव, जातीयता, भटक्या विमुक्त जातींचे प्रश्न यावरही त्या प्रकाश टाकतात

महिला मंत्री म्हणूनही त्यांच्या प्रकटीकरणात ,स्त्रीत्व अढळून येतेच, शिवाय प्रत्येक प्रश्नाला समर्पक उत्तर उपाययोजना सांगणे प्रत्येक घटनेची वस्तुस्थिती अभ्यासून सरकारने केलेल्या योजनांचा ऊहापोह योग्यतऱ्हेने करताना दिसतात. पुरूष आमदार अडचणीत आणणारे प्रश्न टाकण्याचा प्रयत्न करतात. परंतु न डगमगता प्रसंगी त्यांन खडसावूनही निर्भिड उत्तरे दिलेली पहायला मिळतात. महिला मंत्र्यांमध्ये प्रभा राव, प्रतिभाताई पाटील, सुशिला बजाज यांची भाषणे तर प्रभावी आहेतच परंतु त्यांच्या भाषणाला त्याबरोबरच वाङ्मयीन किनारही उठून दिसते. या सर्वांची भाषणे ऐकल्यावर, वस्तुनिष्ठपणा जाणवतो, प्रसंगाविशेष जाणवतात, उत्तम भाषाही जाणवते. बारकाईने चिकित्सा केली तर कदाचित वाङ्मयीन दृष्ट्या ती शून्यही असतील. परंतु आपल्या अध्ययनाचा विषय भाषणांना किती वाङ्मयीन मूल्ये लाभली आहेत, हे पाहण्याचा आहे. स्त्री मूळातच चांगली वक्ता असते. घर – संसार

चालवण्यासाठी तिचे प्रभावी बोलणेच परिणामकारक ठरते. त्यामुळे नकळतच उपमा, अलंकार म्हणी, वाक्प्रचारांचा साक्षात्कार पहायला मिळतो.

एस.एस.सी, पदवीधर कायदेतज्ञ महिला आमदार असूनही शासकीय ठराव मांडणे, अर्धा तासाची चर्चा विषय देणे, सूचना स्थगन प्रस्ताव या आयुधांचा वापर अजून मोठ्या प्रमाणात या महिला आमदारांनी केला पाहिजे. त्याचे कारणही असेच असते. सभापती, विधानसभा अध्यक्ष, पक्षप्रतोद यांच्याकडून महिला आमदारांना बोलण्याची पुरेशी संधी दिली जात नाही.

एकविसावे शतक संगणक युग आहे. त्याचा वापर, कालमानाप्रमाणे झालेली सर्व क्षेत्रातली स्थित्यंतरे यावर त्या प्रकाश टाकतात. आधुनिक संदर्भ, सामाजिक सुधारणा, शिक्षण पद्धती यावर त्या सूचना करताना दिसतात. विषयबदल सूचवतात. आजच्या युगाला काय अपेक्षित आहे. याचाही विचार त्यांच्या भाषणांमध्ये जाणवतो. रूढी परंपरा याला धरूनच चालले पाहिजे असे नाही. काळाचा विचार करा हे त्या सूचवतात. संगणक, टॅब, मोबाईल, मेल, गुगलचाही वापर त्या करतात. विधानपरिषदेत तर २०१७ पासून पेपरलेस कामकाज टॅबद्वारे केले जाणार आहे?

एकूणच १९६२ च्या काळातली स्त्री आमदार व आताची विसाव्या व एकविसाव्या शतकातली स्त्री आमदार यांची भाषा, संदर्भ, दृष्टीकोण यात फरक आढळतो. एकूण उल्लेखनीय परिवर्तन या अभ्यासातून आढळून आले आहे.

- **विधानसभा व लोकसभा ५०% आरक्षण मिळावे...**

आज स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांना ५०% आरक्षण मिळाले आहे १९९१ ला ७३ वी घटनेनुसार ३३% आरक्षण देण्यात आले होते.

सुरूवाती सुरूवातीला महिला उमेदवार मिळायला अवघड जायचे. मग कोणाची पत्नी, तर बहीण, भावजय राजकीय नेते आपल्या घरातीलच महिलेला उभी करत असत.

स्वयंपाक घरातून, शेतातल्या पातीवरून महिला थेट निवडवणूकीच्या मैदानात उतरल्या. कामाची माहिती नाही. राजकारणाचा ओ का ठो माहित नाही. अशावेळी निवडून आल्यानंतर नवरा. दीर, सासरा किंवा वडील व भाऊच तिचे कामकाज करत असत. अंगठा लावणे किंवा सही येत असेल तर फक्त सयाजीरावच काम बहुतांशी महिला करत असत.

अनेक सरपंच महिलांवर त्याच्या अपरोक्ष अविश्वासाचा ठराविक आणला गेला आहे. १५ ऑगस्ट व २६ जानेवारीला महिला सरपंच, पंचायत समिती सभापती यानीच ध्वजवंदन, ध्वज फडकविण्याचे काम करायचे असते. परंतु २००३ पर्यंत गावातली पुरूष मंडळी महिला सरपंचांना हा अधिकार द्यायला तयार नव्हती २००३ ला सर्व सामाजिक संस्थांनी या विरोधात आवाज उठवला तेव्हा महाराष्ट्र सरकारने असा शासन निर्णय काढला की महिला सरपंचांचा अधिकार कोणीही हिसकावू शकत नाही. तेव्हापासून महिला सरपंच ध्वज फडकवू लागल्या.

हळूहळू महिलांमध्ये राजकीय जाणीव जागृती होऊ लागली. जसजसा मान मिळू लागला. त्यांना गोडी वाटू लागली व अनेक सरपंच महिला. पंचायत समितीत निवडून

आलेल्या महिला स्वतःच्या अधिकाराचा वापर करू लागल्या, बोलू लागल्या अधिकाऱ्यांच्या ओल्या पार्ट्या बंद झाल्या. आज गावागावात सुधारणा होते आहे. महिला कचाकड्याच्या बाहुल्या राहिल्या नाहीत. आज नगराध्यक्ष व महापौर महिलांचे प्रमाण फार मोठे आहे. जिल्हा परिषद अध्यक्ष पद ही खूप मोठ्या प्रमाणावर महिला भूषवत आहेत.

परंतु विधानसभा लोकसभेचे काय? या दोन्ही ठिकाणी खऱ्या अर्थाने महिलांना आरक्षण मिळायला हवे. तरच देश प्रगतीपथावर धावू लागेल. अजूनही लोकसभेत १०% च्या वर महिला नाहीत. विधानसभेत १५% च्या वर महिला नाहीत.

विधानसभेत निवडून आलेल्या महिलांचे कार्य आपण या प्रबंधात पाहिलेच आहे. लोकसभेतही स्व.इंदिरा गांधी, सुषमा स्वराज, सुमित्रा महाजन, प्रतिभाताई पाटील, प्रमिला दंडवते, मृणाल गोरे, अहिल्या रांगणेकर इत्यादी अनेक विचारवंत महिलांनी लोकसभेचे सभागृह गाजवले आहे.

सन्माननीय अटलबिहारी वाजपेयींच्या काळापासून विधानसभा व लोकसभेत महिला आरक्षण मिळावे हे विधेयक मांडण्यात येते. परंतु त्यावर चर्चा ही नाही व संमत ही होत नाही.

आज प्रत्येक क्षेत्रात स्त्रिया आघाडीवर आहेत. अशावेळी विधानसभा व लोकसभा या दोन्ही सभागृहात महिलांना आरक्षण मिळणे ही काळाची गरज आहे. स्त्री आमदार किंवा खासदार पुरूष आमदार व खासदारांपेक्षा सक्षम आहेत असे म्हटले तर काही वावगे ठरणार नाही. म्हणूनच यासाठी विधानसभा व लोकसभेमध्ये महिलांना आरक्षण मिळणे गरजेचेच आहे. खरतर स्थानिक स्वराज्यसंस्थांप्रमाणे या दोन्ही सभागृहात ५०% आरक्षणच महिलांना मिळाले पाहिजे. समाजाचा अर्धा हिस्सा व समाजनिर्मिती या आरक्षणापासून वंचित राहणे. भारतासारख्या प्रगतीपथावर असलेल्या देशाला न शोभणारे आहे. पुरूष स्त्रियांच्या कर्तृत्वाला घाबरतात. एकदा का त्यांचा मतदारसंघ आरक्षणामुळे महिलांना मिळाला तर, त्या मन लावून काम करतील. आपली व्यवहार कुशलता, कल्पकता, बुद्धिमता व कष्टकरण्याची प्रवृत्ती यामुळे त्या मतदार संघाच्या कायापालट त्या करू शकतात. मग पुन्हा आरक्षण उठले तरी जनरल मधून ही मतदार त्या महिला उमेदवाराचीच मागणी करतात. हे आपण स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकीत पहातो आहोत. आज स्थानिक स्वराज्य संस्थेत ५०%आरक्षण असले तरी, जनरलमधूनही महिला निवडून येतात व सभागृहात महिला ६०% पुरूष ४०% अशी परिस्थिती काही ठिकाणी दिसून येते.

म्हणूनच कदाचित सर्वच पक्षातील पुरूष खासदार याला पाठिंबा देत नसतील, परंतु आत्ताचे पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी हे मात्र महिला आरक्षणाचा विषय गांभिर्याने घेतील व तो त्यांनी घ्यावा. तरच त्यांनी आखलेले लक्ष, कृतीआराखडा, अर्थकारण, विदेशनीती, कायदा-सुव्यवस्था, परिवहन, रेल्वे, सहकार कृषी या विविध क्षेत्रात काम करताना महिलांना समान संधी दिली गेली तर देश प्रगतीचा वेग वायुवेगाने पुढे नेईल.

- **१९६२ ची आमदार स्त्री व आत्ताची आमदार स्त्री**

१९६२ ची आमदार स्त्री काम करत असताना, आत्तासारख्या सुविधा नव्हत्या, सुरूवातीला पगारही नसायचा. कार ने प्रवास करताना एस.टी रेल्वेने प्रवास, कोणत्याही घटनेची माहिती घ्यायची तर प्रत्यक्ष त्या ठिकाणी जाण्याशिवाय गत्यंतर नसायचे. आज विमान भत्ताही आमदारांना मिळतो, संगणक युग आहे. सोशल मीडीया मुळे त्वरित माहिती मिळते. स्विय सहाय्यकालाही भरपूर पगार मिळतो. त्यामुळे तो फक्त पेपर वागविण्याचे काम न करता, माहिती जमा करण्याचे ऑफिसवर्क, प्रश्न तयार करणे हे सर्व तो पाहतो. घरातली जबाबदारी पूर्णपणे पार पाडल्याशिवाय बाहेर पडता येत नसे, शेतातही राबावे लागायचे. आमदारांना वेतनच नव्हते.

घरातला एखादा पुरूष मग तो नवरा, भाऊ ,मुलगा प्रवासात सतत बरोबर ठेवायला लागायचा. स्त्री स्वातंत्र्य नव्हते. स्त्री स्वयंभू नव्हती. प्रत्येक निर्णय घरातल्या कर्त्या पुरूषाला विचारल्याशिवाय घेतला जात नव्हता. आमदार असूनही त्या काळात आमदारांनाच वाचन, मनन, लिखाण करावे लागायचे. संपर्काची साधणे अपुरी होती. त्यामुळे त्या काळच्या महिला आमदार संपर्कात आघाडीवर होत्या. त्याच्या गोष्टींशी अनुभवांची शिदोरी सतत असायची. प्रसंगानुरूप त्वरित पोहोचणे, गाठीभेटी चर्चा यावर भर असायचा. आज दूरदर्शनसारखे प्रभावी माध्यम आहे. असंख्य चॅनेल्स त्याच्यावर आहेत, त्यावर विविधविषयावर चर्चा होत असते. महाराष्ट्राच्याच नव्हे तर देशातल्या व जगातल्या कानाकोपऱ्यात काय घडतेय यांचा वृत्तांत पहायला मिळतो. त्यामुळे ज्ञानात भर पडते. शिवाय गुगल हे एक महाभंडार आहे. प्रत्येक विषयाची माहिती रेकॉर्डसहित पहायला मिळते. ऐनवेळचा विषय जरी चर्चेला आला तरी, माहिती त्वरित मिळते. त्या विषयांवरची पुस्तके शोधा. वाचा टिपण करा हे करावे लागत नाही. १९६२ च्या आमदार स्त्रियांना या दिव्यातून जावे लागायचे. त्याकाळी मेहनत होती. परंतु त्यामुळे बोलण्यात वस्तुनिष्ठपणा, ठामपणा व परिपक्वता दिसायची. त्याकाळची आमदार स्त्री रूढी-परंपरा, संस्कृती जपणारी, या गोष्टींना महत्व देणारी होती. आजची आमदार स्त्री या विषयांवर गंभीर बोलेलच असे नाही. काळ बदलला आहे. राहणीमान बदलले आहे. विचारही बदलले आहेत. परिणामही बदलले आहेत. बुरसट विषयांना आत्ता प्राधान्य दिले जात नाही. आजची स्त्री आमदार स्वतंत्र आहे. स्वतःचे निर्णय स्वतः घेते. स्वीय सहाय्यकालाही भरपूर पगार मिळतो. प्रवास भत्ता, विमान प्रवासाची सोय असते. राहण्यासाठी दोन दोन फ्लॅट मिळतात. वाहनासाठी लोन मिळते. दहा टक्क्यात घर मिळते. आरोग्यसेवा परिवारासहीत मिळतात, टॅब मिळतात. त्यामुळे व्हॉट्सऍप, ट्विटर, फेसबूक, गुगलचा सहज वापर करताना स्त्रीया दिसतात. एकूण दोन काळातली तुलना सविस्तरपणे प्रस्तुतकर्तीने प्रबंधात केली आहे.